
गाथा
आपल्या स्वातंत्र्यसैनिकांची



संपादन
अवनीश पाटील
दत्तात्रय मचाले

गाथा आपल्या स्वातंत्र्यसैनिकांची
(कोल्हापूर, सांगली, सातारा)

प्रकाशक : **डॉ. व्ही. एन. शिंदे**
कुलसचिव
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर-४१६ ००४.

© सर्व हक्क प्रकाशकाधीन

मुद्रक : **श्री. भूषण पाटील**
अधीक्षक
शिवाजी विद्यापीठ मुद्रणालय,
कोल्हापूर - ४१६००४.

मुखपृष्ठ : श्री. राहुल रेपे

मुद्रितशोधक : बाजीराव पां. जठार

प्रथम आवृत्ती : १५ ऑगस्ट, २०२५


प्रती : १०००

मूल्य : ६३०/-

ISBN : 978-93-48427-51-9

सदर पुस्तकाचे मुखपृष्ठ, आतील मजकूर अथवा चित्र कोणत्याही स्वरूपात वा माध्यमात पुनः प्रकाशित अथवा संग्रहित करण्यासाठी मा. कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांची पूर्वपरवानगी घेणे बंधनकारक आहे.

म्हावशीकर व मालक देशपांडे करत होते. या मोर्चामध्ये चाफळ भागातील कार्यकर्त्यांसह हरी रोमण हेही सहभागी झाले. हरी रोमन यांनी भूमिगत कार्यकर्त्यांना अनेक प्रकारे मदत केली. मोर्चे, निदर्शने यामध्ये ते पुढे असत. हरी रोमन हे क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या प्रतिसरकार यामध्ये सहभागी झाले. हरी रोमन यांना ढोलदऱ्यात विहिरीजवळ पोलिसांनी पकडले. त्यांना काठींचा मार दिला. या मारामुळे त्यांना अपंगत्व आले. पुढे काही काळानंतर भूमिगत कार्यकर्त्यांची माहिती बंडू बोरगे यांनी पोलिसांना दिली. यातच हरी रोमन यांना पोलिसांनी पकडले व उंब्रज येथे आणले. ब्रिटिशविरोधी कारवायांमुळे त्यांना ११ महिने तुरुंगवासाची शिक्षा करण्यात आली. त्यांची विजापूर व बेळगाव कारागृहात रवानगी करण्यात आली. स्वातंत्र्योत्तर भारतामध्ये ते डेरवण गावातील सामाजिक कार्यात सक्रिय राहिले. हरी लक्ष्मण रोमन यांना तत्कालीन मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या हस्ते सन्मानपत्र व सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले.



७५

वीर किसन महादेव

किसन महादेव वीर यांचा जन्म पुणे-बंगळूर महामार्गावरील कवठे जि. सातारा येथे ११ ऑगस्ट १९०६ रोजी झाला. त्या दिवशी गोकुळाष्टमी असल्याने त्यांचे नाव किसन ठेवण्यात आले. त्यांच्या आईचे नाव हिराबाई. किसन सहा महिन्यांचे असतानाच प्लेगच्या साथीत आईचे निधन झाले. त्यांचे पालनपोषण थोरले बंधू व त्यांच्या पत्नी भागिरथीबाईंनी केले. वयाच्या नवव्या वर्षी त्यांच्या प्राथमिक शिक्षणास कवठ्यातच सुरुवात झाली. तिथेच ते सहावीपर्यंत शिकले. १४ व्या वर्षी पाचगणीतील कापड व्यापारी हरिभाऊ गाडेकर यांची कन्या राधाबाई हिच्याशी त्यांचा विवाह झाला. १९२६ मध्ये वयाच्या विसाव्या वर्षी कवठ्याचे एकनाथ धोकटे यांची कन्या लक्ष्मीबाई यांच्याशी त्यांचा दुसरा विवाह झाला.

किसन वीरांचा मित्रपरिवार मोठा होता. त्यांना तालीम व व्यायामाचीही आवड होती. दुकानात हातमागाचे कापड विकण्याचा वडिलांचा व्यवसाय होता. काँग्रेसच्या आदेशावरून २६ जानेवारी १९३० हा दिवस पहिला स्वातंत्र्य दिन म्हणून किसन वीरांनी कवठ्यात साजरा केला.

मुंबई इलाख्याचे गव्हर्नर फ्रेडरिक्स क्लाईक्स हे सत्काराकरिता १२ जुलै १९३० रोजी सातारला जात असताना किसन वीर व दोनशे स्वयंसेवकांनी त्यांना काळे झेंडे दाखविले आणि कवठ्याजवळ महामार्गावर जोड्याची माळ बांधली. किकली गावाखालील बेलमाचीमधील डोंगरात किसन वीर व गावच्या लोकांनी जनावरे सोडून दिली आणि जंगल सत्याग्रह केला. किसन वीरांना या जंगल

सत्याग्रहाबद्दल अकरा महिने सक्तमजुरी आणि पंचवीस रुपये दंड झाला. येरवडा कारागृहातून त्यांची १० ऑगस्ट १९३१ रोजी सुटका झाली.

८ ऑगस्ट १९४२ रोजी महात्मा गांधींसह काँग्रेस श्रेष्ठींना पोलिसांनी मुंबईत अटक केली. तेव्हा किसन वीर गावातच होते. शिरूभाऊ लिमयेंचा निरोप घेऊन १० ऑगस्ट १९४२ रोजी डी. जी. देशपांडे किसन वीरांना भेटले. किसन वीरांनी लगेच ११ ऑगस्ट १९४२ रोजी बाबासो मुल्ला, आप्पा डेरे, गणपती घाडगे, कृष्णा कांबळे, गणपती डेरे, शंकर ओझर्डेकर, मारूती मोहिते, नारायण पोळ, रामू लक्ष्मण भागवत, खंडेराव डेरे या सहकाऱ्यांशी विचारविनिमय करून ब्रिटिश राज्य खिळखिळे करण्याचा संकल्प जाहीर केला. १५ ऑगस्ट १९४२ रोजी यशवंतराव चव्हाण कवठ्यास येऊन किसन वीरांना भेटले. दोघांच्या चर्चेत पुढील कार्याची दिशा ठरली.

शिरुभाऊ लिमयेंकडून डुप्लिकेट मशीन व दारूगोळा घेऊन गावी येत असताना सातारच्या हद्दीत पोलिसांनी १८ सप्टेंबर १९४२ रोजी किसन वीरांना अटक केली. त्यांना येरवडा कारागृहात ठेवले. ३१ ऑक्टोबर १९४२ रोजी अभेद्य समजल्या जाणाऱ्या येरवडा तुरुंगाच्या भिंतींवरून उड्या मारून किसन वीरांनी पलायन केले. यात त्यांच्यासह भाई छन्नुसिंह चंदेले, भाई विभुते, पांडुरंग मास्तर आणि पैलवान बलदेव प्रसाद गुप्ता होते. या साहसी कृत्याबाबत यशवंतराव चव्हाणांनी 'किसनवीरांची ही साहसी उडी म्हणजे सातारा जिल्ह्यातील चळवळीचे नवे पाऊल होते.' असे प्रशंसोद्‌गार काढले.

किसन वीर सातारा जिल्ह्यात आले. पोलिसांनी त्यांना पकडण्यासाठी छापे टाकले. त्यांच्या आश्रयदात्यांना पकडले. जबर मारहाण केली. पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर व सोलापूर या पाच जिल्ह्यांत धुंडाळले. पण त्यांचा थांगपत्ता लागला नाही. किसन वीर सैदापूरच्या रानात यशवंतराव चव्हाणांना भेटले. यावेळी डी. जी. देशपांडे हजर होते. रेल्वेने कराडहून ते तारगाव स्टेशनवर उतरले. त्यांना उतरून घेण्यास एम. जी. भागवत वकील, डी. जी. देशपांडे, दादासाहेब साखवळकर वगैरे हजर होते. पोलिस त्यांच्या शोधात होतेच. परंतु पोलिसांचा डोळा चुकवून सूटबूट घालून किसन वीर नांदगावला निघून गेले. तेथे बाबूराव घोरपडे यांच्याकडे काही दिवस थांबले.

यावेळी त्यांनी वाईची कोर्ट इमारत जाळण्याचे ठरवले. ६ नोव्हेंबर १९४२ च्या रात्री दोन वाजता रास्ते वाड्यातील कोर्ट आवारात बाळ दिवाण, आप्पा पंत, द्वारकानाथ जोशी उतरले. अन्य सात जण बाहेर थांबले. वाड्यात राहणाऱ्या न्या. लोकूरना बाहेर जाण्यास सांगितले आणि कोर्ट इमारत पेटवून दिली. ब्रिटिश सरकारला हा फार मोठा दणका होता.

किसन वीरांना लोक आबा म्हणत. त्यांच्यासमवेत रघुनाथ पोळ सतत असायचे. पोलिसांना चुकविण्यासाठी पोळांचेही टोपण नाव 'आबा' ठेवले. परवलीचा शब्द शंभो महादेव हरहर असा ठरला. ३० नोव्हेंबर १९४२ रोजी रात्री एम. एन. जाधव, डी. जी. देशपांडे, शंकरराव जाधव, पांडू तात्या बोराटे, बाळ दिवाण, आप्पा पंत, तुकाराम शिंदे, महादू सुतार यांनी उडतारे बंगला पेटविला. हमरस्त्यावरील विरमाडे पूल उडविल्यास मिलिटरीची वाहतूक ठप्प होणार होती. देहू रोड फॅक्टरीतून शक्तिशाली डायनामाईट आणून तो पुलाखाली ठेवला आणि बत्ती पेटविली. पुलाचा कठडा पंचवीस

फूट उद्ध्वस्त झाला. पूल कमकुवत झाला. वाहतूक बंद झाली. मग मात्र पोलिसांची झोप उडाली.

किसन वीरांनी केलेल्या जागृतीमुळे भूमिगत चळवळीत महिला भाग घेऊ लागल्या. पोलिसांनी गीताबाई बाबर, खाशीबाई पोळ, कृष्णाबाई कदम यांना सहा महिने स्थानबध्द करून ठेवले. यानंतर एम. एन. जाधव, डी. जी. देशपांडे वगैरे सहा भूमिगतांनी शिरगाव घाटात वाई-वाठार पोस्टमेल लुटली आणि ब्रिटिशांना आणखी एक धक्का दिला.

मुंबई इलाख्याचे गव्हर्नर जॉन कॉलव्हील यांचा सातारच्या राजवाड्यात सत्कार समारंभ ठेवला होता. ही बातमी एम. जी. भागवतांनी किसन वीरांना सांगितली. हा सत्कार समारंभ उधळून लावण्याची योजना किसन वीर व डी. जी. देशपांडेंनी तयार केली. दोघे बॉम्ब आणण्यासाठी कोल्हापूरला गेले. कोल्हापूरच्या प्रभात फिल्म कंपनीत भोसले नावाचे डी. जी. देशपांडेंचे मित्र होते. त्यांचेकडून बॉम्ब व टिकल्या मिळणार होत्या. ते आणण्यास भोसले थोडा वेळ बाहेर गेले. पिशवीत बॉम्ब घेऊन दुपारी ४ वाजता रेल्वेने हे दोघे रहिमतपूर स्टेशनकडे निघाले. स्टेशनवर सुखरूप पोहोचले. तेथून गव्हर्नरच्या रस्त्यावर बॉम्ब पुरून ठेवले. परंतु पोलिस तपासात बॉम्बचा सुगावा लागला. सर्वत्र खळबळ उडाली आणि गव्हर्नर भेट रद्द झाली.

भूमिगतांच्या लिंब, कामेरी, पणुंब्रे येथील बैठकांना किसन वीर आवर्जून हजर होते. तुकाराम कोडगुले व अहमदनगर मिलिटरी कॅम्प अधिकाऱ्याच्या पत्नीकडून त्यांनी काडतुसे गोळा केली. किसन वीरांचे जिवलग स्नेही हुतात्मा भाई कोतवाल यांची पुण्यतिथी वेगळ्या पध्दतीने म्हणजे मुंबई शहरातील वीज बंद पाडून साजरी करण्यात आली. ३१ डिसेंबर १९४३ रोजी रात्री १२ वाजता खांब तोडून मुंबईचा वीज पुरवठा बंद पाडला. सर्वत्र हाहाकार उडाला. मिरग्याची वाडी येथे भूमिगतांची मार्च १९४४ मध्ये व्यापक बैठक झाली. या बैठकीत किसन वीरांची भूमिगतांचे डिक्टेटर (प्रमुख) म्हणून निवड झाली. कोरेगावच्या कार्यकर्त्यांनी किसन वीरांच्या विचाराने २४ डिसेंबर १९४४ रोजी सातारच्या पोलीस मुख्यालयातील तीन रायफली आणून किसन वीर, पांडू तात्या बोराटे व बापूसाहेब कचरे यांना दिल्या. याबद्दल पोलिसांनी हरिभाऊ जगदाळे, बाबूराव जंगम, तुकाराम पवार, सुंदर सिंग, ज्ञानू गुरव वगैरेंना अटक करून खटला भरला. सर्वजण निर्दोष सुटले. पण त्यांना १८ महिने स्थानबद्ध केले.

सातारा जिल्ह्यातील काँग्रेस उमेदवारांचा १९४६ च्या निवडणुकीत किसन वीरांनी तुफानी प्रचार केला व सर्व उमेदवार निवडून आणण्यात मोठा हातभार लावला.

ते स्वातंत्र्योत्तर काळात सातारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे चेअरमन, सातारचे खासदार म्हणून निवडून आले होते. स्व. यशवंतराव चव्हाण यांनी एके ठिकाणी सहकारी व मित्र म्हणून किसन वीरांबद्दल काढलेले गौरवपूर्ण उद्गार अगदी उचित वाटतात- ''मी ज्या थोड्या मित्रांवर निर्धास्तपणे अवलंबून होतो, त्यामध्ये आबांचे स्थान फार वरचे आहे. संग्रामातील साथी म्हणून आणि खाजगी जीवनातील मित्र म्हणून किसन वीरांसारखा माणूस मिळणार नाही.'' त्यांचे २७ डिसेंबर १९७९ रोजी निधन झाले.

६८. **म्हमाणे भैरू मल्लाप्पा:** लेखन- स्नेहल सयाजी शिंदे, मार्गदर्शन- डॉ. सुमित संभाजी यादव (डी. पी. भोसले महाविद्यालय, कोरेगाव), शब्दांकन- डॉ. अजितकुमार जाधव (आर्टस्, कॉमर्स अँन्ड सायन्स कॉलेज, नागठाणे)

६९. **यादव जगन्नाथ मारुती:** लेखन- सूरज काटकर, सागर भूप, मार्गदर्शन- प्रा. एस. डी. कांबळे, प्रा. अमृत साळुंखे (शहाजीराजे महाविद्यालय, खटाव)

७०. **यादव राऊ राघू:** लेखन- नंदकुमार विठोबा रेडेकर (संशोधक विद्यार्थी, इतिहास अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर)

७१. **रसाळ हरी गोविंद:** लेखन- प्रा. रेश्मा विनायक काळेल (पद्मभूषण डॉ. क्रांतिवीर नागनाथअण्णा नायकवडी कला महाविद्यालय, झरे)

७२. **रूपनवर बाबुराव तुकाराम:** लेखन- प्रसाद शिंदे, ओंकार फडतरे, शब्दांकन- प्रा. अमृत साळुंखे, मार्गदर्शन- डॉ. एस. डी. कांबळे (शहाजीराजे महाविद्यालय, खटाव)

७३. **रोमन केशव बाळा:** लेखन- नंदकुमार विठोबा रेडेकर (संशोधक विद्यार्थी, इतिहास अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर)

७४. **रोमन हरी लक्ष्मण:** लेखन- नंदकुमार विठोबा रेडेकर (संशोधक विद्यार्थी, इतिहास अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर)

७५. **वीर किसन महादेव:** लेखन- डॉ. भिमाशंकर बिराजदार (प्रमुख, इतिहास विभाग, किसन वीर महाविद्यालय, वाई), शब्दांकन- डॉ. दत्तात्रय मचाले (सहा. प्राध्यापक, इतिहास अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर)

७६. **शेख आबुलाल जंगीभाई:** लेखन- डॉ. दत्तात्रय मचाले (सहा. प्राध्यापक, इतिहास अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर)

७७. **शेख बंडू यासीन (शेखकाका):** लेखन- डॉ. दत्तात्रय मचाले (सहा. प्राध्यापक, इतिहास अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर)

७८. **शेजवळ विश्वनाथ परशुराम:** लेखन- प्रा. राहुल गंगावणे, मार्गदर्शन- डॉ. अजितकुमार जाधव (आर्टस्, कॉमर्स अँन्ड सायन्स कॉलेज, नागठाणे)

७९. **शेवाळे पांडुरंग बळवंत:** लेखन- नंदकुमार विठोबा रेडेकर (संशोधक विद्यार्थी, इतिहास अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर)

८०. **सरताळे नरहरी (भाऊ) एकनाथ:** लेखन- अभिषेक राजन सूर्यवंशी, मार्गदर्शन- डॉ. सुमित संभाजी यादव (डी. पी. भोसले महाविद्यालय, कोरेगाव)

८१. **सय्यद अदम अबन:** लेखन- प्रा. शंकर नामदेव गेजगे (आमदार शशिकांत शिंदे महाविद्यालय, मेढा, जि. सातारा), मार्गदर्शन- डॉ. भिमाशंकर बिराजदार (प्रमुख, इतिहास विभाग, किसन वीर महाविद्यालय, वाई)

८२. **साखळकर कृष्णाजी तथा दादासाहेब माधव:** लेखन- पल्लवी दिलीप चव्हाण, शब्दांकन- डॉ. सुमित संभाजी यादव (डी. पी. भोसले कॉलेज, कोरेगाव)

८३. **साळुंखे डॉ. गोविंदराव तथा बापूजी ज्ञानोजीराव:** लेखन- डॉ. सुरेश वसंत शिखरे (प्रमुख, इतिहास विभाग, श्री. शहाजी छत्रपती महाविद्यालय, कोल्हापूर)

८४. **साळुंखे पांडुरंग नारायण:** लेखन- मयूर अरुण माने, मार्गदर्शन- प्रा. ए. ए. पटेल, प्रा. डॉ. आर. आर. हाके, शब्दांकन- प्रा. अझरुद्दीन पटेल (काकासाहेब चव्हाण कॉलेज, तळमावले)

८५. **सुपेकर एकनाथ जयाप्पा:** लेखन- सोमनाथ तानाजी लोहार, मार्गदर्शक- प्रा. सिद्धेश्वर सपकाळ (आर्टस् ॲन्ड कॉमर्स कॉलेज, मायणी)

८६. **सुतार रामचंद्र कृष्णाजी:** लेखन- ओंकार फडतरे, विशाखा गायकवाड, मार्गदर्शन- प्रा. एस. डी. कांबळे, प्रा. अमृत साळुंखे (शहाजीराजे महाविद्यालय, खटाव)

८७. **होमणे दिनकर गणपत:** मुलाखत- श्री. विश्वास दिनकर होमणे, लेखन- काजल रमेश भिलारे, शब्दांकन- प्रा. रेश्मा देवरे (श्रीमती मीनलबेन मेहता कॉलेज, पाचगणी), मार्गदर्शन- डॉ. भिमाशंकर बिराजदार (प्रमुख, इतिहास विभाग, किसन वीर महाविद्यालय, वाई)

-- संकीर्ण --

१. **जाधव तुळशीदास सुभानराव:** लेखन- धनाजी सावंत (संशोधक विद्यार्थी, इतिहास अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर)

२. **जोशी गणेश वामन तथा बाबुराव:** लेखन- धनाजी सावंत (संशोधक विद्यार्थी, इतिहास अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर)

३. **भोसले दत्तोबा ईश्वरराव:** लेखन- डॉ. व्ही. एन. शिंदे (कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर)

४. **सारडा श्रीकिसन लक्ष्मीनारायण:** लेखन- धनाजी सावंत (संशोधक विद्यार्थी, इतिहास अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर)

५. **हरोलीकर पद्माताई व्यंकटेश:** लेखन- प्रा. कल्पना गुरव (डी. आर. माने महाविद्यालय, कागल)

◆◆◆

'भारताचा स्वातंत्र्यलढा' हा देशाला मिळालेला एक देदीप्यमान वारसा आहे. हा लढा केवळ राष्ट्रीय पातळीवरील काही नेते आणि घटना यांच्यापुरता मर्यादित नव्हता, तर असंख्य सामान्य नागरिक, वीरांचा त्याग आणि त्यांच्या समर्पणातून तो साकारलेला होता. तथापि, या सामान्य नागरिक आणि वीरांच्या गोष्टी मात्र स्वातंत्र्यलढ्याच्या इतिहास कक्षेत समाविष्ट झाल्या नव्हत्या.

प्रारंभीच्या काळात इतिहासकरांनी लिहिलेला स्वातंत्र्य चळवळीचा इतिहास हा मुख्यत्वे राष्ट्रीय काँग्रेस आणि सशस्त्र क्रांतिकारकांच्या कार्यावर केंद्रित होता. त्यामध्ये महत्त्वाच्या लोकांच्या कार्यावर भर होता. त्यामुळे या इतिहासाचे स्वरूप काहीसे 'अभिजनवादी' झाले होते. म्हणून या इतिहासात सामान्य माणसाचे प्रतिबिंब अपवादानेच उमटते.

अशा विस्मृतीत गेलेल्या सामान्य नायकांच्या असामान्य कर्तृत्वाचा इतिहास उजागर करण्यासाठी शिवाजी विद्यापीठाने स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त 'अभिवादन स्वातंत्र्यसैनिकांना' हा अभिनव प्रकल्प हाती घेतला. त्यामधूनच **'गाथा आपल्या स्वातंत्र्यसैनिकांची'** हा एक मौलिक आणि महत्त्वपूर्ण ग्रंथ सिद्ध झाला आहे. ज्यामधून प्रथमच दक्षिण महाराष्ट्रातील स्वातंत्र्य चळवळीचे सर्वसमावेशक चित्र सर्वांसमोर येत आहे.

प्रस्तुत ग्रंथात कोल्हापूर, सांगली आणि सातारा या तीन जिल्ह्यांतील तब्बल ३६६ ज्ञात-अज्ञात स्वातंत्र्यसैनिकांची शौर्यगाथा शब्दबद्ध केली आहे. ज्यामधून स्वातंत्र्यलढ्याच्या इतिहासाला नवे परिमाण लाभले आहे. सखोल संशोधन, दुर्मीळ मुलाखती आणि विश्वसनीय माहितीच्या आधारे इतिहासाला नवा उजाळा देण्यात आला आहे. हा ग्रंथ केवळ स्वातंत्र्यसैनिकांची शौर्यकथा नसून, दक्षिण महाराष्ट्रातील स्वातंत्र्य चळवळीचे स्वरूप, त्याची व्याप्ती आणि वैशिष्ट्ये उलगडून दाखवणारा मौलिक साधनग्रंथ बनला आहे.

हा ग्रंथ म्हणजे आपल्या मातीतील नायकांच्या पराक्रमाला दिलेली मानवंदना आहे. तो सामान्य वाचक, अभ्यासक आणि संशोधकांसाठी स्वातंत्र्यलढ्याचे आकलन अधिक समृद्ध करणारा आणि त्याकडे पाहण्याची नवीन दृष्टी देणारा एक अनमोल ठेवा आहे.

डॉ. अरुण भोसले
भारतीय स्वातंत्र्यलढ्याचे ख्यातनाम अभ्यासक,
माजी प्रमुख, इतिहास अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

SHIVAJI UNIVERSITY PRESS
978-93-48427-51-9
इतिहास अधिविभाग
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
मूल्य : रु. ६३०/-

Estd : 1962
'A'''' *Accredited by* NAAC (2021)
with CGPA 3.52

शिव-वाणी
शिवाजी विद्यापीठाची स्वतंत्र वाहिनी
SUBSCRIBE & LISTEN ON YOUTUBE TO @ShivVaani

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

G20 भारत 2023 INDIA

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

इतिहास अधिविभाग

प्रमाणपत्र

श्री./श्रीमती/प्रा./ डॉ. भिमाशंकर बिराजदार

यांनी शिवाजी विद्यापीठाने प्रकाशित केलेल्या ''गाथा आपल्या स्वातंत्र्यसैनिकांची'' या ग्रंथामध्ये .०३.. स्वातंत्र्यसैनिकांच्या नोंदीचे लेखन/ संपादन केले. त्याबद्दल आपणास प्रमाणपत्र देण्यात येत आहे. आपण दिलेल्या योगदानाबद्दल मनःपूर्वक आभार !!!

दिनांक : ०१ ऑक्टोबर, २०२६

डॉ. अवनीश पाटील
विभागप्रमुख
इतिहास अधिविभाग
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



प्रा. (डॉ.) राजनीश कामत
कुलगुरू
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर